0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २५/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) मे. के.बी. प्रॉडक्ट्स प्रा.लि. यांचे दिनांक २०/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवदेन.

३) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२२/२०१३/जा.२६६, दिनांक २६/०३/२०१३, ०५/०४/२०१३ व १२/०४/२०१३.

४) तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक (प्रशासन), नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांचे दिनांक ०२/०४/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

५) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे तथा अनुज्ञप्ती प्राधिकारी यांचा दि.०५/०४/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.

६) मे. के.बी. प्रॉडक्ट्स प्रा.लि. चे संचालक जगदीश जैन यांचे दिनांक १०/०४/२०१३ रोजी प्राप्त लेखी निवेदन.

७) पब्लिक हेल्थ लॅबोरेटरी, कोकणभवन, नवी मुंबई यांचे पत्र क्र. पीएचएल/केबीएन/फुड/१२९६/२०१३ अन्वये दक्षता शाखेकडून दि. ०३/०६/२०१३ रोजी प्राप्त पृथ:करण अहवाल.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२२/२०१३/जा.६३७
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १२/०७/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १३/०३/२०१३ रोजी या कार्यालयास मे. के. वी. प्रॉडॅक्टस प्रा.लि., दादोबा कंपाऊंड, अंजूर फाटा, अंजूर रोड, वळगांव, तालुका - भिवंडी, ठाणे - ४२१ ३२१ या ठिकाणी खाद्यतेलाची विनापरवाना खरेदी व विक्री केली जात असल्याबाबत मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयातीत फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी हे पंचांसह दादोबा कंपाऊंड, वळगांव येथे सरकारी वाहनाने गाळा क्र. ९४५, ९४६ आणि १ ते ६ या ठिकाणी रात्रौ ८.३० वाजता पोहचले असता सदर सर्व गाळे बंद असल्याचे आढळले. गाळयाबाहेर सिक्यूरिटी

0002

उपस्थित होते. त्यास त्यांचे नांव विचारले असता त्याने त्यांचे नांव संतोष शुक्ला व लवकुश मिश्रा असे सांगून ते नायर सिक्यूरिटी फोर्स या कंपनीचे सिक्यूरिटी असल्याचे सांगितले. कंपनीचे मालकाबाबत चौकशी केली असता, त्यांनी सदर कंपनीचे मालक जगदीश जैन असल्याचे सांगितले. त्यांचेकडे जगदीश जैन यांचे भ्रमणध्वनीबाबत विचारणा केली असता, त्यांनी तो ९३२३६४६७५९ असा असल्याचे सांगितले. त्यानुसार सदर भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता तो बंद असल्याचे आढळले. तद्नंतर सदर कंपनीचा दरवाजा उघडेपर्यंत पंचांसह पथकातील सर्व अधिकारी वर नमूद पत्त्यावर घटनास्थळी थांबले.

दिनांक १४/०३/२०१३ रोजी सकाळी सुमारे ९.३० वाजता एक इसम सदर गाळयाच्या ठिकाणी उपस्थित झाला. अधिकाऱ्यांनी सदर इसमास स्वत: ची ओळख करुन देऊन त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव जगदीश सुखरामजी जैन असे असून ते सदर कंपनीचे संचालक असल्याचे पंचांसमक्ष अधिकाऱ्यांना सांगितले. त्यानंतर त्यांनी कंपनीचा कुलुपबंद लोखंडी शटर असलेला मुख्य दरवाजा उघडला. तद्नंतर त्यांचेसमवेत पंच व अधिकाऱ्यांनी सदर गाळयामध्ये प्रवेश केला. अधिकाऱ्यांनी सदर गाळयात कोणता व्यवसाय चालतो याबाबत विचारणा केली असता, सदर गाळयामध्ये के.बी. प्रॉडक्टस् प्रा.लि. या नावांने खाद्यतेलाचा/ तूपाचा घाऊक व्यवसाय चालतो असे सांगितले. दरम्यान भिवंडी विभागाचे शिधावाटप अधिकारी पांडूरंग सखाराम बेलोटे व शिधावाटप निरिक्षक श्री. साळवे हे घटनास्थळी सुमारे १०.२५ वाजता उपस्थित राहिले. परवानाधारकाकडे अधिकाऱ्यांनी सदर गाळयामध्ये चालत असलेल्या व्यवसायाबाबत अधिक विचारणा केली असता, त्याने सदर गाळयामध्ये विविध प्रकारचे खाद्यतेल व तूप मे. अशोक ऑईल्स मिल्स, भिवंडी, विकास एन्टरप्रायजेस, मुंबई- ४०० ००२, हेरिटेज फूडस् प्रा.लि., सानपाडा, नवी मुंबई, भोलेबाबा मिल्क फूड इंडस्ट्रीज लि. भिवंडी, राजारामबापू सहकारी दुग्ध संघ मर्या. इस्लामपूर, राहूल फूड पॉडक्टस्, पूर्णा व्हिलेज, भिवंडी, किर्ती सॉलवेक्स लि., लातूर, अनिक इंडस्ट्रीज लि., भिवंडी, स्वराज इंडीया इंडस्ट्रीज लि. निमभोर, सातारा, श्री मरीअम्मन ट्रेडर्स, तामिळनाडू, श्री विष्णू ट्रेडर्स, कोलेंगूड, पलक्कड, रॉयल राना मिल्क फूडस् प्रा.लि., पंजाब, विजय ऑईल मिल्स, वडाळा, किर्ती ॲग्रोटेक लि. लातूर, श्री सबरीवेलन ट्रेडर्स, कोलेंगूड, पलक्कड इ. विविध कंपन्यांकडून बल्कमध्ये खाद्यतेल/तूपाचा साठा खरेदी करुन त्याचे १०० मि.लि., २०० मि.लि. , ५०० मि.लि., १ लिटर, २ लिटर, ५ लिटर, १५ किलो व १५ लिटर पत्र्याचे डब्बे, प्लॅस्टिक कॅन व प्लॅस्टिक बॉटलमध्ये पॅकींग करुन विविध विक्रेत्यांना त्यांच्या मागणीनुसार विक्री करत असल्याचे पंचासमक्ष सांगितले.

अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष व्यवसायाकरिता साठवणूक केलेल्या खाद्यतेलाचे वर नमूद पत्त्यावरील साठवणूक परवाना तसेच कंपनीस आवश्यक असणारे इतर परवान्याबाबत विचारणा केली असता, जगदीश सुखरामजी जैन यांनी पंचासमक्ष पुढील कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या. १) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांचेकडून धारण केलेली खाद्यतेल घाऊक विक्रीची अनूज्ञाप्ती मेसर्स के.बी. प्रॉडक्टस् प्रा.लि. या नावाने, दादोबा

कंपाऊंड, ९४६, अंजूर रोड, वळ व्हिलेज, ता-भिवंडी, जि-ठाणे या पत्त्यावरील अनुज्ञाप्ती क्र. ३७ फ/भिवंडी/सं.प./६४/घाऊक, दिनांक ३१.१२.२०१३ पर्यंतची सादर केली. अन्न व औषध प्रशासन यांचेकडील परवाना मेसर्स के.बी. प्रॉडक्टस् प्रा.लि. या नावाने, दादोबा कंपाऊंड, ९४५, ९४६ व १ ते ६, अंजूर फाटा, अंजूर रोड, वळगांव, ता-भिंवडी, जि-ठाणे या पत्त्यावरील परवाना क्र. ११५१२०१४०००१७७ दिनांक ३१.१२.२०१६ पर्यंतची सादर केला. ३) जगदीश जैन व केवलबी जैन यांचे नांवे असलेली घर नं. ९४६ ची घरपट्टी पावती क्र. ४६२ दि. ०६.०५.२००८ ची सादर केली. सदरची घरपट्टी सन २००८-२००९ या कालावधीची सादर केली. ४) माहे जानेवारी २०१३ ते १३ मार्च २०१३ पर्यंत आवक झालेल्या, खरेदी केलेल्या इनवॉइस/बिलांची मूळ प्रती तपासणीकरिता सादर केल्या.

| अ. क्र. | खरेदी केलेल्या कंपनीचे नांव | इनवॉइस क्रमांक व दिनांक | तेलाचा प्रकार | वजन (लिटर्स) |
|---|---|---|---|---|
| १. | श्री मरीअम्मन ट्रेडर्स, तामिळनाडू | ७/२६, दि. १.१.२०१३ | खोबरेल तेल | १७,४५७ |
| २. | श्री साबरीवेलन ट्रेडर्स, केरळा | १ दि. ११.१.२०१३ | खोबरेल तेल | १७,७५८ |
| ३. | श्री विष्णू ट्रेडर्स, केरळ | ५ दि. २४.१.२०१३ | खोबरेल तेल | १७,८२० |
| ४. | किर्ती सॉलवेक्स लि. लातूर | ११४ दि. २.१.२०१३ | सनफलॉवर | १८,४८० |
| ५. | किर्ती ॲग्रोटेक लि. लातूर | ४३५ दि. १६.१.२०१३ | सनफलॉवर | १८,१०० |
| ६. | किर्ती ॲग्रोटेक लि. लातूर | ४५८ दि. २१.१.२०१३ | सनफलॉवर | १७,८४२ |
| ७. | किर्ती ॲग्रोटेक लि. लातूर | ४९१ दि. ३०.१.२०१३ | सनफलॉवर | १८,२०५ |
| ८. | विजय ऑईल मिल्स, वडाळा | ३०३१ दि. १४.१.२०१३ | तिळ तेल | ४,९५० |
| ९. | अशोक ऑईल मिल्स, दापोडा, भिवंडी | ४७२२ दि. ३१.१.२०१३ | तिळ तेल | ३,५४७ |
| १०. | श्री मरिअम्मन ट्रेडर्स, तामिळनाडू | ७/४४ दि. ४.२.२०१३ | खोबरेल तेल | १७,५७८ |
| ११. | श्री विष्णू ट्रेडर्स, केरळ | ८ दि. १५.२.२०१३ | खोबरेल तेल | १७,९१९ |
| १२. | श्री मरिअम्मन ट्रेडर्स, तामिळनाडू | ८/९ दि. २३.२.२०१३ | खोबरेल तेल | १७,६४४ |
| १३. | किर्ती सॉलवेक्स लि. लातूर | १३३ दि. २५.२.२०१३ | सनफलॉवर | १७,८८० |
| १४. | विजय ऑईल मिल्स, वडाळा | ३३४२ दि. ४.२.२०१३ | तिळ तेल | ४,१२५ |
| १५. | अशोक ऑईल मिल्स, दापोडा, भिवंडी | ४७४६ दि. २५.२.२०१३ | तिळ तेल | १,८९२ |
| १६. | अशोक ऑईल मिल्स, दापोडा, भिवंडी | ४७२१ दि. १.२.२०१३ | राई तेल | २,३६५ |
| १७. | अशोक ऑईल मिल्स, दापोडा, भिवंडी | ४७३८ दि.१२.२.२०१३ | राई तेल | ३,५४८ |
| १८. | अशोक ऑईल मिल्स, दापोडा, भिवंडी | ४७४६, ४७४७ दि. २५.२.२०१३ | राई तेल | ५,६७६ |
| १९. | श्री मरिअम्मन ट्रेडर्स, तामिळनाडू | ८/१५ दि. ७.३.२०१३ | खोबरेल तेल | १७,९२९ |
| २०. | अशोक ऑईल मिल्स, दापोडा, भिवंडी | ४७५६ दि. १.३.२०१३ | राई तेल | ४,२५७ |
| २१. | अशोक ऑईल मिल्स, दापोडा, भिवंडी | ४७६३ दि. ८.३.२०१३ | राई तेल | १,१८२ |
| २२. | अशोका ऑईल इंडस्ट्रीज, जयपूर | १७८१ दि. ११.३.२०१३ | राई तेल | १७,४०२ |
| २३. | अशोक ऑईल मिल्स, दापोडा, भिवंडी | ४७७१ दि. १३.३.२०१३ | राई तेल | २,६०१ |

0004 अधिकाऱ्यांनी जगदीश जैन यांच्याकडे अधिक विचारणा केली असता, वरील नमूद बिलानुसार विविध कंपन्यांकडून खरेदी केलेला खाद्यतेलाचा साठा मोटारव्दारे पाईपच्या सहाय्याने तळमजल्यावर व पोटमाळयावर असलेल्या लोखंडी/अल्यूमिनियम टाक्यांमध्ये साठवणूक करुन त्याचे २०० मि.लि., ५०० मि.लि., १ लिटर, २ लिटर, ५ लिटर, १५ लिटर व १५ किलो पत्र्याच्या डब्यामध्ये तसेच प्लॅस्टिक कॅन व पाऊचमध्ये पॅकींग करुन त्याची विक्री करत असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी परवान्याबाबत चौकशी केली असता, जगदीश जैन यांनी मे. के.बी.प्रॉडक्टस् प्रा.लि. या ट्रेड नांवाने खाद्यतेल घाऊक परवाना तपासणीकरिता अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सादर केला. सदर परवान्याचे अवलोकन/तपासणी केली असता सदरच्या परवान्यावर प्रा.लि. हे शब्द निळ्या रंगाच्या पेनाने लिहिल्याचे दिसून आले. याबाबत साशंकता वाटल्याने अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष परिमंडळ कार्यालयास दूरध्वनी करुन तेथील परवाना नोंदवही तपासणीकरिता मागवून घेतली. त्याप्रमाणे उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ कार्यालयातील शिधावाटप निरिक्षक सर्वश्री प्रभूणे व रेडीज हे सायंकाळी ४.३० वाजता घटनास्थळी परवानासंबंधीचे दस्तऐवज घेऊन उपस्थित राहिले. सदर नोंदवहीमध्ये मेसर्स के.बी.प्रॉडक्टस् असे व्यापारी नांव नमूद असून सदर परवाना, दादोबा कंपाऊंड, ९४६ अंजूर रोड, वळ व्हिलेज, तालुका- भिवंडी, जिल्हा- ठाणे असा पत्ता नमूद असून मालक जगदीश सुखरामजी जैन या नावाने तसेच वेगळे गोदाम नमूद नसलेला परवाना दिनांक ३१.०१२.२०१३ पर्यंत वैध असल्याचे नोंदवहीवरुन आढळून आले. सदर गोदामाला लागून असलेल्या गाळा क्र. १ ते ६ या गोदामांची परवान्यावर नोंद करण्यासाठी अनुज्ञप्ती प्राधिकारी यांचेकडे अर्ज सादर केल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले व त्याबाबतची पोचपावती तपासणीचे वेळी पंचांसमक्ष सादर केली.

तदनंतर जगदीश सुखरामजी जैन यांना व्यवसायासाठी आवश्यक असणारे टाक्यांचे कॅलिब्रेशन चार्ट सादर करण्यास सांगितले असता, कॅलिब्रेशन चार्ट उपलब्ध नसल्याचे पंचासमक्ष अधिकाऱ्यांना सांगितले. तसेच टाक्यांमधील साठवलेल्या खाद्यतेलाची पातळी तपासणीची लेव्हल ट्यूब्स टाक्यांना लावण्यात आले नसल्याचे आढळुन आले. अधिकाऱ्यांनी पंच व जगदीश सुखरामजी जैन तसेच प्रेमनाथ मढवी, सुपरवायझर यांचे समक्ष घटनास्थळी असलेल्या घर क्र. ९४५, ९४६ व गाळा क्र. १ ते ६ येथील टाक्यांमधील तसेच विविध क्षमतेचे डब्बे, जार, बॅाटल्स व सुटे खाद्यतेल/तूप साठयाचे मोजमाप/मोजदाद केले असता, ते खालीलप्रमाणे आढळले.

गाळा क्र. ९४६ मधील खाद्यतेल साठा खालीलप्रमाणे.

| खाद्यतेल प्रकार | ब्रॅन्डचे नांव | नग | एकूण साठा (लिटर्स) |
|---|---|---|---|
| तिळ तेल | नाकोडा | ३७ बॉक्स (२०नग)= ७४० x १ लि | ७४० |
| | | ३८ बॉक्स (४०नग)= १५२० x .५०० मि. लि | ७६० |
| | | २० बॉक्स (१००नग)= २००० x .२०० मि.लि | ४०० |
| | | ३ बॉक्स (२०० नग)= ६०० x .१०० मि.लि | ६० |
| | | १३५ डब्बे x १६.४८४ लि. | २२२५.३४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | सुटे तिळ तेल | प्लॅस्टिकचे ३ ड्रम x २१५ किलो | ७०८.७९ |
| | | प्लॅस्टिकचा १ ड्रम x २०० लि. | २०० |
| एकूण | | | ५०९४.१३ |

गाळा क्र. ९४५ मधील खाद्यतेल साठा खालीलप्रमाणे.

| खाद्यतेल प्रकार | टाकी क्रमांक | एकूण साठा (लिटर्स) |
|---|---|---|
| खोबरेल तेल | १ | २३३६.७६ |
| | २ | १७८२.६८ |
| | ३ | ३३८०.२५ |
| | ४ | ८५७६.१६ |
| राई तेल | ५ | ४१३३.०५ |
| | ६ | १२५९१.८१ |
| एकूण | | ३२८००.७१ |

| खाद्यतेल प्रकार | ब्रॅन्डचे नांव | नग | एकूण साठा (लिटर्स) |
|---|---|---|---|
| खोबरेल तेल | नाकोडा कोको स्पेशल | १०९ नग x १५ किलो | १७९६.७५ |
| | | ३ ड्रम x ५० किलो | १६४.८३ |
| | सुटे तेल | १०० लिटर | १०० |
| एकूण | | | २०६१.५८ |

घर नं. ९४५ या गोदामात खाद्यतेलाचा एकूण साठा ३४८६२.२९ लिटर्स एवढा आढळून आला.

गाळा क्र. १ ते ६ मधील खाद्यतेलाचा साठवणूक केलेला साठा खालीलप्रमाणे.

| खाद्यतेल प्रकार | टाकी क्रमांक | एकूण साठा (लिटर्स) |
|---|---|---|
| सनफलॉवर तेल | १० | ८५८.५४ |
| | ११ | १२८७.८२ |
| | १२ | ६४३.९१ |
| | १३ | ९१६.५५ |
| एकूण | | ३७०६.८२ |

| खाद्यतेल प्रकार | टाकी क्रमांक | एकूण साठा (लिटर्स) |
|---|---|---|
| खोबरेल तेल | १४ | १०८२.८५ |
| | १५ | ५४९९.३४ |
| एकूण | | ६५८२.१९ |

| खाद्यतेल प्रकार | ब्रॅन्डचे नांव | नग | एकूण साठा (लिटर्स) |
|---|---|---|---|
| सनफलॉवर ऑईल | नाकोडा रिफाइंड सुर्यमुखी तेल | ११५ बॉक्स (१५ जार)= १७२५ x १ लि | १७२५ |

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FICE

0006

| | | | |
|---|---|---|---|
| | | २५ बॉक्स (१५ जार)= २५ X १५लि | ३७५ |
| | | ७४ बॉक्स (४० नग)=२९६० X .५०० मि.लि | १४८० |
| | | २८ बॉक्सं (२० नग)= ५६० X १ लि | ५६० |
| | | सुटे ३० लिटर | ३० |
| | | एकूण सनफ्लॉवर ऑईल | ४१७० |

| खाद्यतेल प्रकार | ब्रॅन्डचे नांव | नग | एकूण साठा (लिटर्स) |
|---|---|---|---|
| खोबरेल तेल | नाकोडा कोको स्पेशल | ६५ बॉक्स (४ नग)= २६० X ५ लि. | १३०० |
| | | ८८ बॉक्स (२०० नग)= १७६०० X .१०० मि.लि. | १७६० |
| | | २१ बॉक्स (३६० नग)= ७५६० X .५० मि.लि | ३७८ |
| | | १ बॉक्स (१०० नग)= १०० X .२०० मि.लि | २० |
| | | ३१ बॉक्स (२०० नग)= ६२०० X .१००मि. लि | ६२० |
| | | ८१ बॉक्स (४० नग)= ३२४० X .५०० मि.लि | १६२० |
| | | ३० बॉक्स (२०० नग)= ६००० X .१००मि.लि | ६०० |
| | | ४५ बॉक्स (३६ नग)= १६२० X .५०० मि.लि | ८१० |
| | | १९ बॉक्स (२० नग)= ३८० X १ लि | ३८० |
| | | ७ बॉक्स (१०० नग)= ७०० X .२०० मि.लि | १४० |
| | | १५ बॉक्स (७२० नग)= १०८०० X .२५ मि.लि | २७० |
| | | ५४ बॉक्स (३८४ नग)= २०७३६ X .५० मि.लि | १०३६ |
| | | १ बॉक्स (१०० नग)= १०० X .२०० मि.लि | २० |
| | | एकूण | ८,९५४ |
| खोबरेल तेल | सुटे तेल | ड्रम क्र. १ मधील ५१५ लिटर | ५१५ |
| | | ड्रम क्र. २ मधील ६०० लिटर | ६०० |
| | | ड्रम क्र. ३ मधील ३०० लिटर | ३०० |
| | | ड्रम क्र. ४ मधील ६०० लिटर | ६०० |
| | | ड्रम क्र. ५ मधील ६०० लिटर | ६०० |
| | | ड्रम क्र. ६ मधील ५० लिटर | ५० |
| | | ड्रम क्र. ७ मधील २५ लिटर | २५ |
| | | एकूण | २६९० |

सदर गाळा क्र. १ ते ६ मधील सनफ्लॉवर तेल ७८७६.८२ लिटर तसेच खोबरेल तेल १८२२६.१९ लिटर्स असे मिळून २६१०३.०१ लिटर्स साठा तपासणीत आढळून आला.

गाळा क्र. ९४६ मधील तूप (देशी घी) साठा - १७४८६ लिटर.

गाळा क्र. ९४५ मधील तूप (देशी घी) साठा - २२०७४ लिटर.

गाळा क्र. १ ते ६ मधील तूप (देशी घी) साठा - ७५४६९.२०० लिटर.

तपासणीत आढळून आलेले वर नमूद देशी घी वर शासनाचे निर्बंध नसल्याने सदरचा ११५०२९.२०० लिटर्स साठा हा कारवाईतून निरस्त करण्यात आलेला आहे..

घर क्रमांक ९४५, ९४६ व गाळा क्र. १ ते ६ मधील एकूण पॅकींग केलेला व लूझमधील तसेच टाक्यांमधील विविध खाद्यतेलाचा साठा खालीलप्रमाणे आढळून आला.

| अ.क्र. | साठविलेले ठिकाण | विविध खाद्यतेलाचा एकूण साठा (लिटर्समध्ये) |
|---|---|---|
| १. | घर नंबर ९४५ | ३४८६२.२९ |
| २. | घर नंबर ९४६ | ५०९४.१३ |
| ३. | गाळा क्र. १ ते ६ | २६१०३.०१ |
| एकूण | | ६६०५९.४३ |

एकूण १२ टाक्यांमधील तसेच विविध प्रकारच्या खाद्यतेलाचा पॅकींग केलेला व सुटे (लूझ) असे मिळून एकूण ६६०५९.४३ लिटर्स एवढा साठा सकृतदर्शनी तपासणीत पंचासमक्ष अधिकाऱ्यांना आढळून आला.

त्यानंतर कंपनीचे संचालक जगदीश सुखरामजी जैन यांना साठा पुस्तक सादर करण्यास सांगितले असता, त्यांनी प्रमाणित करुन घेतलेले साठा पुस्तक तपासणीकरिता पंचासमक्ष सादर केले. सदरचे साठा पुस्तकाची तपासणी केली असता, दिनांक १४.०३.२०१३ रोजी सुरुवातीची शिल्लक कोकोनट ऑईल १५७७ लिटर, सनफ्लॉवर ऑईल ६४५ लिटर, मस्टर्ड तेल (राई तेल) १७४०२ लिटर, शिसम (तिळ) तेल ४९२४ लिटर असे मिळून २४५४८ लिटर आढळून आली.

अधिकाऱ्यांनी सदर तपासणीमध्ये पंचासमक्ष खाद्यतेलाचा साठा पुस्तकात २४५४८ लिटर तर प्रत्यक्षात पॅकींग केलेला व टँकमधील विविध प्रकारच्या खाद्यतेलाचा साठा ६६०५९.४३ लिटर आढळून आला. म्हणजेच ४१५११.४३ लिटर (३७७.७५ क्विंटल) खाद्यतेलाचा साठा जास्त आढळून आला. म्हणजेच एवढया साठयाच्या नोंदी साठा पुस्तकात घेतलेल्या नाहीत, असे दिसून येत आहे.

उपरोक्त टाक्यांमधील सर्व प्रकारच्या खाद्यतेलाचे पंच तसेच जगदीश सुखरामजी जैन यांचे समक्ष स्वच्छ पारदर्शक प्लास्टीकच्या १ लिं. क्षमतेच्या बाटल्यांमध्ये प्रत्येकी चार असे नमूने घेण्यात आले व त्यास नमूना चिठ्ठया लावून जागीच पंचांच्या तसेच जगदीश सुखरामजी जैन यांच्या स्वाक्षरीनिशी जागीच सीलबंद करण्यात आले.

अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष तसेच परवानाधारक जगदीश सुखरामजी जैन यांच्यासमक्ष घर क्र. ९४५, ९४६ व गाळा घर १ ते ६ मध्ये साठवणूक केलेला विविध खाद्यतेलाचा एकूण ६६०५९.४३ लिटर्स एवढा साठा तपासणीत आढळून आला. शासनाचे दिनांक ७ फेब्रूवारी २०११ रोजीचे खाद्यतेलाचा घाऊक व्यवसायासाठी साठा मर्यादा आदेश निर्गमित केले असून त्यानुसार ग्रामीण भागाकरिता खाद्यतेल साठवणूक क्षमतेची कमाल मर्यादा ३०० क्विंटल निश्चित करण्यात आली आहे, असे अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष परवानाधारक जगदीश सुखरामजी जैन यांच्या

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

निदर्शनास आणून दिले. तपासणीच्या वेळी परवानाधारकाच्या घटनास्थळी आढळून आलेल्या पत्यावरील एकूण प्रत्यक्ष साठा ६६०५९.४३ लिटर्स म्हणजेच ६०१.१४ क्विंटल एवढा साठा आढळला. यावरुन परवानाधारकाने विहित कमाल मर्यादेपेक्षा ३०१.१४ क्विंटल खाद्यतेलाचा अतिरिक्त साठा केल्याचे आढळून आल्याने पंचासमक्ष परवानाधारक जगदीश सुखरामजी जैन यांचा लेखी जबाब नोंदवून घेतला.

तपासणीत वर नमूद केल्याप्रमाणे साठा मर्यादेपेक्षा जास्त आढळून आलेल्या खाद्यतेलाच्या जप्त केलेल्या साठयाचा तपशील पुढीलप्रमाणे.

| खाद्यतेल प्रकार | जप्त केलेल्या मालाचा तपशील | एकूण साठा (लिटर्स) | दर प्रति लिटर (रुपये) | एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|
| सनफलॉवर तेल | गाळा नं. १ ते ६ मधील टाकी क्र १० मधील साठा | ८५८.५४ | ८३ | ७१२५८.८२ |
| | गाळा नं. १ ते ६ मधील टाकी क्र ११ मधील साठा | १२८७.८२ | ८३ | १०६८८९.०६ |
| | गाळा नं. १ ते ६ मधील टाकी क्र १२ मधील साठा | ६४३.९१ | ८३ | ५३४४४.५३ |
| | गाळा नं. १ ते ६ मधील टाकी क्र १३ मधील साठा | ९१६.५५ | ८३ | ७६०७३.६५ |
| खोबरेल तेल | गाळा नं. १ ते ६ मधील टाकी क्र १४ मधील साठा | १०८२.८५ | १०० | १०८२८५.०० |
| | गाळा नं. १ ते ६ मधील टाकी क्र १५ मधील साठा | ५४९९.३४ | १०० | ५४९९३४.०० |
| सनफलॉवर ऑईल | नाकोडा रिफाइंड सुर्यमुखी तेल. ११५ बॉक्स (१५ जार) = १७२५ X १ लि | १७२५ | ८३ | १४३१७५.०० |
| | नाकोडा रिफाइंड सुर्यमुखी तेल. ७४ बॉक्स (४० जार) = २९६० X .५०० मि.लि | १४८० | ८३ | १२२८४०.०० |
| | नाकोडा रिफाइंड सुर्यमुखी तेल. २८ बॉक्स (२०नग) = ५६० X १ लि. | ५६० | ८३ | ४६४८०.०० |
| | नाकोडा रिफाइंड सुर्यमुखी तेल. २५ बॉक्स X १५ लि. | ३७५ | ८३ | ३११२५.०० |
| | सुटे ३० लिटर | ३० | ८३ | २४९०.०० |
| खोबरेल तेल | नाकोडा कोको स्पेशल २१ बॉक्स (३६० नग) = ७५६० X .५० मि.लि | ३७८ | १०० | ३७८००.०० |
| | नाकोडा कोको स्पेशल १९ बॉक्स (२० नग)=३८० X १ लि | ३८० | १०० | ३८०००.०० |
| | नाकोडा कोको स्पेशल ७ बॉक्स (१०० नग)= ७०० X .२०० मि.लि | १४० | १०० | १४०००.०० |
| | नाकोडा कोको स्पेशल ६५ बॉक्स (४ नग)= २६० X ५ लि | १३०० | १०० | १३००००.०० |
| | नाकोडा कोको स्पेशल ८८ बॉक्स (२०० नग)= १७६०० X .१०० मि.लि | १७६० | १०० | १७६०००.०० |
| | नाकोडा कोको स्पेशल ३१ बॉक्स (२०० नग)= ६२०० X .१०० मि.लि | ६२० | १०० | ६२०००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नाकोडा कोको स्पेशल ८१ बॉक्स (४० नग)= ३२४० X .५०० मि.लि | १६२० | १०० | १६२०००.०० |
| | नाकोडा कोको स्पेशल ३० बॉक्स (२०० नग)= ६००० X .१०० मि.लि | ६०० | १०० | ६००००.०० |
| | नाकोडा कोको स्पेशल ४५ बॉक्स (३६ नग)= १६२० X .५०० मि.लि | ८१० | १०० | ८१०००.०० |
| | नाकोडा कोको स्पेशल १५ बॉक्स (७२० नग)= १०८०० X .२५ मि.लि | २७० | १०० | २७०००.०० |
| | नाकोडा कोको स्पेशल ५४ बॉक्स (३८४ नग)= २०७३६ X .५० मि.लि | १०३६ | १०० | १०३६००.०० |
| | नाकोडा कोको स्पेशल १ बॉक्स (१०० नग)= १०० X .२०० मि.लि | २० | १०० | २०००.०० |
| तिळ तेल | घर नं. ९४६ मधील साठा खालीलप्रमाणे. नाकोडा ३७ बॉक्स (२०नग)= ७४० X १ लि | ७४० | १७२ | १२७२८०.०० |
| | नाकोडा ३८ बॉक्स (४०नग)= १५२० X .५०० मि. लि | ७६० | १७२ | १३०७२०.०० |
| | नाकोडा २० बॉक्स (१००नग)= २००० X .२०० मि.लि | ४०० | १७२ | ६८८००.०० |
| | नाकोडा ३ बॉक्स (२०० नग)X .१०० | ६० | १७२ | १०३२०.०० |
| | १३५ डब्बे X १६.४८४ लि. | २२२५.३४ | १७२ | ३८२७५८.४८ |
| | सुटे तिळ तेल प्लॅस्टिकचे ३ ड्रम X २१५ किलो | ७०८.७९ | १७२ | १२१९११.८८ |
| खोबरेल तेल | घर नं. ९४५ मधील साठा खालीलप्रमाणे. नाकोडा कोको स्पेशल १०९ नग X १५ किलो | १७९६.७५ | १०० | १७९६७५.०० |
| | ३ ड्रम X५० किलो | १६४.८३ | १०० | १६४८३.०० |
| | सुटे तेल | १०० | १०० | १००००.०० |
| खोबरेल तेल | घर क्र. ९४५ मधील टाकी क्र. ४ मधील साठा | २७४४ | १०० | २७४४००.०० |
| | एकूण जप्त केलेला साठा लिटर्स मध्ये | ३३०९२.७२ | | ३५२७७४३.४२ |
| | एकूण जप्त केलेला साठा क्विंटल मध्ये | ३०१.१४ | | |

सदर तपासणीत एकूण रुपये ३५,२७,७४३.४२ (अक्षरी पस्तीस लाख सत्तावीस हजार सातशे त्रेचाळीस रुपये बेचाळीस पैसे फक्त) एवढया किंमतीचा खाद्यतेलाचा साठा पंचासमक्ष जप्त केला.

दरम्यान अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष स्थानिक पोलीस ठाणे, नारपोली यांचेशी भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधून घटनेची माहिती दिली व त्याप्रमाणे पोलीस घटनास्थळी उपस्थित झाले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष मे. के.बी. प्रॉडक्टस् प्रा.लि. चे संचालक जगदीश सुखरामजी जैन यांचेकडे प्रत्यक्ष मोजदाद केलेला ६६०५९.४३ लिटर्स म्हणजेच ६०१.१४ क्विंटल खाद्यतेलाचा साठयापैकी विहित कमाल मर्यादेपेक्षा ३०१.१४ क्विंटल खाद्यतेलाचा अतिरिक्त साठा दि महाराष्ट्र शेडयूल कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर, १९९८ चे कलम १५ (सी) अन्वये घटनास्थळी जप्त करुन पोलीसांच्या ताब्यात देण्यात आला.

अशाप्रकारे मे. के.बी.प्रॉडक्टस् प्रा.लि. ९४६, ९४५ व त्यालगतच्या गाळा क्र. १ ते ६, दादोबा कंपाऊंड, अंजूर रोड, वळगांव, तालुका- भिवंडी, जि- ठाणे यांनी नमूद पत्त्यावर मोठया प्रमाणात साठवणूक केलेला खाद्यतेल या जीवनावश्यक वस्तूचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगुन स्वत:च्या स्वार्थासाठी, आर्थिक फायद्यासाठी सदर कंपनीच्या संचालकाने शासनाची तसेच उपभोक्त्याची फसवणूक केल्याचे सकृतदर्शनी दिसून आले. सबब महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ तसेच त्या अनुषंगाने देण्यात आलेल्या अनुज्ञाप्तीमधील अटी व शर्तींचा व पर्यायाने जिवनावश्यक वस्तू कायदा १९५५ च्या कलम ३, ७, ८, ९ व १० चा भंग केल्याचे आढळल्यावरुन मे. के. बी. प्रॉडक्ट्स प्रा. लि. चे संचालक जगदीश सुखरामजी जैन व इतर संचालकांविरुध्द नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी येथे गुन्हा नोंद क्र. II २४/२०१३, दिनांक १५/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र.,१ अन्वये केलेली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमां का करण्यात येऊ नये ? याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०२/०४/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०२/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. के.बी. प्रॉडक्ट्स प्रा.लि. कंपनीचे संचालक जगदीश सुखरामजी जैन यांचे वतीने मे. म्हात्रे अँड असोसिएसट्सचे ॲड. श्री किशोरकुमार म्हात्रे यांनी वकालनाम्यासह उपस्थित राहुन त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १०/०४/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १०/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक (प्रशासन) श्री. जे.के. ढमाळ यांनी उपस्थित राहुन यापुर्वी वाचावे क्र. ४ अन्वये टपालामार्फत अभिवेदन सादर केल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीस मे. के.बी. प्रॉडक्ट्स प्रा.लि. कंपनीचे संचालक जगदीश सुखरामजी जैन व केवचलंद बी. जैन हे व त्यांचे वतीने मे. म्हात्रे अँड असोसिएसट्सचे ॲड. श्री किशोरकुमार म्हात्रे यांनी उपस्थित राहुन सदर प्रकरणी त्यांना अधिक म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ३०/०४/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ३०/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. के.बी. प्रॉडक्ट्स प्रा.लि. कंपनीचे संचालक केवलचंद बी. जैन व जगदीश एस. जैन हे व त्यांचे वतीने मे. म्हात्रे अँड असोसिएट्सचे अ‍ॅड. श्री किशोरकुमार म्हात्रे यांनी उपस्थित राहुन सदर प्रकरणी यापुर्वी टपालामार्फत सादर केलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले.

पब्लिक हेल्थ लॅबोरेटरी, कोकणभवन, नवी मुंबई यांचे पत्र क्र. पीएचएल/केबीएन/फुड/१२९६/२०१३ अन्वये प्राप्त झालेल्या पृथःकरण अहवालामध्ये, " the above samples nos. X-46, X-32, X-22 and X-57 conform to the standards of Sunflower Oil as per Food Safety & Standards regulations-2011 and the above samples nos. X-48 and X-53 does not conform to the standards of Mustard Oil as per Food Safety & Standards regulations-2011.", असे नमूद आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

मे. के.बी. प्रॉडक्ट्स प्रा.लि. यांचे दिनांक २०/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवदेनात, आपल्या निदर्शनास नम्रपणे आणू इच्छितो की, माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये आपल्या विभागाने टाकलेल्या धाडीत एकूण ७३८.१७ क्विंटल जप्त केलेल्या खाद्यतेलाच्या साठ्यापैकी ३०० क्विंटल साठा मुक्त करुन उर्वरीत ४३८.१७ क्विंटल साठा हा आजमितीस त्यांच्या कंपनीत साठवणूक केला असून सद्यस्थितीत प्रकरण प्रलंबित आहे. दिनांक १४ मार्च, २०१३ रोजी पुन्हा टाकण्यात आलेल्या धाडीत त्यांच्या कंपनीत एकूण ६६१.५५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा साठवणूक केला असून त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे, एकूण ६६१.५५ क्विंटल साठ्यापैकी २२३.३८ क्विंटल हा साठा पुस्तकानुसार व उर्वरीत ४३८.१७ क्विंटल हा पूर्वी पासूनचा जप्त साठा आहे. त्याअनुसार प्रत्यक्ष साठा उपलब्ध होता. त्यांचा अतिरिक्त साठवणूक करण्याचा कोणताही उद्देश नव्हता. सदरच्या धाडीत अतिरिक्त दर्शविण्यात आलेला ३०१.१४ क्विंटल साठा हा चुकीचा असल्याने साठा मुक्त करण्यात यावा. एकूण ६६१.५५ क्विंटल साठ्यामध्ये पूर्वीचा जप्त असलेला ४३८.१७ क्विंटल साठा हा वजा करणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने त्यांच्याकडील २२३.३८ क्विंटल साठा हा साठवणूक असल्याचे दिसून येते. सद्यस्थितीत त्यांचे व्यवसाय बंद असल्याने त्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. त्यामुळे त्यांना गुंतवणूकदारास व्याजाची रक्कम देणे शक्य झाले नाही. तसेच कामगारांना काम नसल्याने ते बसून आहेत. तरी आपणांस विनंती करण्यात येते की, मुक्त आदेश पारीत करण्यात यावेत. जेणेकरुन त्यांना त्यांचे व्यवसाय सुरु करणे शक्य होईल, असे नमूद केले आहे.

तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक (प्रशासन), नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांचे दिनांक ०२/०४/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, सदर गुन्ह्यात पाहिजे असलेला आरोपी मे. के.बी. प्रॉडक्ट्स, दादोबा कॅम्पौंड, अंजुरफाटा-मानकोलीरोड, वळगांव, ता. भिवंडी, जि. ठाणे या कंपनीचे संचालक १) श्री. जगदीश

सुखराज जैन वय ४८ वर्षे, रा. आत्मबंधु बिल्डींग, सेक्टर २०, जी एस बेलापुर गावठाण, बेलापुरगांव, नवी मुंबई यांचा त्यांचे दिले पत्त्यावर तसेच कंपनीचे ठिकाणी शोध घेतला असता ते मिळुन आलेले नाहीत. सदर आरोपीत याने दिनांक १६/०३/२०१३ रोजी मा. जिल्हा सत्र न्यायालय,.ठाणे येथे अटक पुर्व जामीन मिळणे बाबत जामीन अर्ज क्रमांक ४८९/२०१३ केलेला असल्याने मा. न्यायालयाने सदर आरोपीस इंटेरियम बेल मंजुर करुन त्यास पुढील आदेश होई पर्यंत अटक करु नये असे आम्हांस लेखी आदेश दिलेले आहेत. मे. के.बी. प्रॉडक्ट्सचे मालक याने दिलेल्या जबाबात, त्यांचे कंपनीमध्ये खोबरेल तेल, सनफ्लावर तेल, राईचे तेल, तिळाचे तेलाचे, गायी म्हशीचे तुपाचे पॅकींग करुन सदरचे सर्व मालावर त्यांचे कंपनीचे नाकोडा या नावाचे लोगो (प्रिंटेड लेबल) लावुन सदरचे तेलाची महाराष्ट्र, अहमदाबाद (गुजरातराज्य), राजस्थान या राज्यांमध्ये होलसेल दराने विक्री करण्याचा व्यवसाय करीत असल्याचे सांगितले आहे. त्यांचे कंपनीत तामीळनाडू येथुन खोबरेल तेल, लातुर येथुन सनफ्लावर तेल येते. राईचे तेल हे महाराष्ट्रामधुन येते. सदर तेल टँकर मधुन आमचे कंपनीचे ठिकाणी आल्यानंतर आम्ही टँकर मधील खाद्यतेल, तुप यांचे खाजगी लॅबरोटरी मध्ये गुणवत्ता परिक्षण करुन घेतो व नियमाप्रमाणे गुणवत्ता पुर्ण गुण असल्यास टँकरमधील तेल व तुप कंपनीमध्ये खाली करुन घेतो. 'जर टँकरमध्ये आलेले मालामध्ये योग्यती गुणवत्ता नसेल तर ते तेलाचा व तुपाचा टँकर जेथुन आला त्या कंपनीकडे परत पाठवित असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच कंपनीचे आणखी एक संचालक त्यांचे भाऊ नामे श्री. केवलचंद बख्तावरमलजी जैन हे असल्याचे सांगितले असून ते सध्या बाहेरगांवी गेल्याचे सांगितल्याने त्यांचेकडे तपास करता आला नाही. तरी सदर कंपनीचे संचालक श्री. केवलचंद बख्तावरमलजी जैन हे मिळुन येताच त्यांचेकडे सदर दाखल गुन्ह्याचे अनुषंगाने पुढे अधिक तपास करीत आहोत. सदर कंपनीमध्ये फिर्यादी यांनी दिलेले फिर्यादीप्रमाणे जप्त दाखविलेला एकूण ६०१.१४ क्विंटल खाद्यतेलसाठा जप्त आहे. तसेच यातील आरोपीत श्री. जगदीश जैन यांनी त्यांचे दिलेल्या जबाबामध्ये सांगितलेले हकीकतीप्रमाणे त्यांचे कंपनीत पुर्वी झालेले कारवाईतील सध्या न्यायप्रविष्ठ असलेला खाद्यतेलसाठा फिर्यादी व त्यांचे पथकाने पुन्हा जप्त दाखविलेला आहे काय ? त्याबाबत फिर्यादी यांचेकडे सखोल तपास करणे आहे. तसेच शिधावाटप अधिकारी यांनी वरीलप्रमाणे जप्त केलेल्या अतिरिक्त खाद्यतेलसाठ्याबाबत आपले स्तरावर योग्य ते आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद आहे.

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे तथा अनुज्ञप्ती प्राधिकारी यांचा दि.०५/०४/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवालात, मे. के. बी. प्रॉडक्टस प्रा.लि. यांची अनुज्ञप्ती क्र. ३७/फ/भिवंडी/सं.प./(६४) आहे. अनुज्ञप्तीचा व्यवसायाचा पत्ता :- ९४६, दादोबा कंपाऊंड, अंजूर फाटा, वळ व्हिलेज, तालुका - भिवंडी, जि. ठाणे असा आहे. अनुज्ञप्तीवर अनुसुचित वस्तु खाद्यतेलाची नोंद आहे. अनुज्ञप्ती दिनांक ३१.१२.२०१३ पर्यंत वैध आहे. सदर अनुज्ञप्तीच्या मुळ नस्तीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये मे. के.बी. प्रॉडक्टस प्रा.लि. असल्याबाबतचे कंपनीचे मेमोरेडम जोडलेले आहे. कार्यालयीन अभिलेखावर नोंद घेते वेळी तत्काळातील कर्मचाऱ्यानी अभिलेखावर

मे. के.बी. प्रॉडक्टस असे नमुद केलेले निदर्शनास येते. सदर अनुज्ञप्ती दिनांक १७/१२/२००९ रोजी वितरीत झालेली आहे. परवानाधारकाने दिनांक १८/०१/२०१२ रोजी गाळा क्र. १ ते ५, दादोबा कंपाऊंड, अंजूर फाटा, वळ व्हिलेज, तालुका - भिवंडी, जि. ठाणे अशी गोदामाची नोंद करण्यासाठी या कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जाची चौकशी पूर्ण झालेली आहे. त्यांच्या कार्यालयामार्फत मे. के. बी. प्रॉडक्टस प्रा.लि. यांच्याविरुध्द दिनांक १८/०२/२०१२ रोजी एकूण ८१,११७ लिटर्स खाद्यतेलाचा साठा जप्त करुन सुपुर्दनामा करण्याची कारवाई करण्यात आलेली आहे. प्रस्तूत प्रकरणी, प्रधान कार्यालयाने दिनांक ०९/०४/२०१२ रोजी पारीत केलेल्या आदेशाविरुध्द मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. यांनी मा. न्यायालयात याचिका दाखल केली असल्यामुळे आणि सदर याचिका प्रलंबित असल्यामुळे मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. यांनी प्रस्तावित केलेल्या गोदामाची नोंद करण्याची कार्यवाही पुर्ण झालेली असली तरी, त्याबाबतची नोंद परवान्यावर घेण्यात आलेली नाही. उपरोक्त नमुद वस्तुस्थिती प्रधान कार्यालयास त्याच्या कार्यालयाच्या दिनांक १५/०३/२०१२ रोजीच्या पत्रान्वये निदर्शनास आणण्यात आली आहे, असे नमुद केले आहे.

दिनांक १०/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. के.बी. प्रॉडक्ट्स प्रा.लि. कंपनीचे संचालक जगदीश सुखरामजी जैन व केवचलंद बी. जैन हे व त्यांचे वतीने मे. म्हात्रे अँड असोसिएसट्सचे ॲड. श्री किशोरकुमार म्हात्रे यांनी उपस्थित राहुन युक्तीवाद केला की, कारणे दाखवा नोटीसमध्ये नमुद मुद्दे तसेच त्यांच्यावर लावण्यात आलेले आरोप हे वस्तूस्थितीस अनुसरुन नसल्याने ते अमान्य करीत आहेत. सदर कंपनी ही सन २००७-२००८ या सालात कार्यान्वित झाली असून सद्यस्थितीत कंपनीचे संचालक जगदिश जैन व केवलचंद जैन हे आहेत. कंपनीचा शुध्द घी आणि खाद्यतेलाचा पॅकिंग, ब्रन्डींग, रिफिलिंग आणि विक्रिचा व्यवसाय आहे. कंपनीच्या नावे अन्न व औषधं प्रशासन विभाग, व्हॅट, सी.एस.टी. नोंदणी, वैधमापन शास्त्र विभागाकडून पॅकिंग परवाना, उद्योग संचालक यांचेकडील नोंदणी तसेच वळगांव ग्रामपंचायत, वळ यांचेकंडील परवाना असे विविध परवाने/नोंदणी प्रमाणपत्र वैध आहेत. त्यांची कंपनी नियमितरित्या मासिक विवरणपत्र सादर करीत आहे. माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये आपल्या पथकाने धाड टाकून ४३८ क्विंटल खाद्यतेलचा अतिरिक्त साठा म्हणून जप्त केला आहे. सदर बाबत त्यांचा असा समज होता की, त्यांना १०० टन खाद्यतेलाचा साठा साठवणूक करण्यास परवानगी आहे. परंतू शासन अधिसुचनेनुसार त्यांची कंपनी ही ग्रामपंचायत विभागात असल्याने त्यांना ३० टन कमाल मर्यादा अनुज्ञ आहे. दिनांक ०९/०४/२०१२ च्या आदेशानुसार अतिरिक्त ४३८.१७ क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा शासनजमा करण्याचे आदेश पारीत करण्यात आले. सदर आदेशाबाबत ते व्यतिथ होऊन त्यांनी मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-क अंतर्गत अपिल दाखल केले असून सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे. कंपनीच्या वतीने जप्त साठ्याचे अंतरीम आदेशाकरिता मा. न्यायालयात अर्ज सादर केले आहे. त्यावर निर्णय प्रलंबित आहे. सदरचा साठा त्यांनी आजमितीस जतन केला असून मा. सत्र न्यायालय, मुंबई यांना उपनियंत्रक

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

शिधावाटप यास निर्देशित करुन जप्त साठा विक्री केल्यानंतर येणारी रक्कम शासकिय कोषागरात तात्पुरत्या स्वरुपात भरण्याची विनंती केली आहे. दिनांक १३/०३/२०१३ रोजी फिरत्या पथकाने रात्रौ ०८:३० वाजता भेट दिली असता, त्यावेळेस कंपनी बंद होती. दिनांक १४/०३/२०१३ रोजी सकाळी ०९:३० वाजता कंपनीचे संचालक जगदिश जैन हे उपस्थित झाल्यानंतर पथकाने साठ्याची मोजदाद करण्यास सुरुवात केली. सदर मोजदाद पूर्ण झाल्यानंतर फिरत्या पथकाने खाद्यतेलाचा साठा हा कमाल साठवणूक मर्यादेपेक्षा ३०१.१४ क्विंटल अतिरिक्त असल्याची त्यांचे अभिलेखात नोंद केली. तथापी, कंपनीच्या अभिलेखानुसार यापूर्वी जप्त असलेला ४३८.१७ क्विंटल वगळता २२३.३८ क्विंटल साठा साठवणूक केलेला होता. पथकाने तपासणी पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त साठ्याबाबत आदेशाचा भंग झाला असल्याने कंपनीच्या संचालकांविरुध्द नारपोली पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे. त्याअनुषंगाने मा. सत्र न्यायालय, ठाणे यांनी कंपनीच्या संचालकांना अटकपूर्व जामिन मंजूर केले आहे. मी कंपनीचा संचालक या नाते नम्रपणे विनंती करु इच्छितो की, जप्त साठा हा नाशवंत असल्याने त्यांना बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस ही वरील मुद्यांच्या अनुषंगाने मागे घेण्यात यावी. त्यांची कंपनी सर्व वैधानिक तरतूदींचे, कायदा, नियम व अधिसुचनेचे पालन करीत आहेत. कंपनीकडे खाद्यतेलाच्या व्यवसायासाठी सर्व आवश्यक परवानगी, परवाने आणि प्रमाणपत्र उपलब्ध आहेत. कंपनीने सर्व नोंदवह्या अद्यावत ठेवले असून त्यांनी नियमितरित्या मासिक विवरणपत्र सादर केले आहे. कंपनीने नियमानुसार विहित मर्यादेत साठवणूक केले असून त्यांनी कमाल विहित मर्यादा ओलांडलेली नाही. दिनांक १३/०३/२०१३ व १४/०३/२०१३ रोजी घेण्यात आलेल्या तपासणीमध्ये त्यांच्या कंपनीतील साठा हा साठापुस्तकानुसार विहित मर्यादेच्या आत आहे. त्यानुसार प्राथमिक शिल्लक २२३.३८ क्विंटल, आवक निरंक, वितरण निरंक व प्रत्यक्ष शिल्लक २२३.३८ क्विंटल आहे. सदरचा साठा हा विहित मर्यादेच्या आत असल्याने व कोणत्याही नियमाचा भंग झालेला नसल्याने त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करणे योग्य नाही. तपासणीच्या वेळी साठा मोजदाद करताना यापूर्वी जप्त असलेला साठा हा त्यामध्ये समाविष्ठ करण्यात आलेला आहे. वास्तविकरित्या दिनांक ०९/०४/२०१२ च्या आदेशाविरुध्द मा. सत्र न्यायालय येथे अपिल दाखल केले असून सदरचे प्रकरण सद्यस्थित न्यायप्रविष्ठ आहे. कंपनीने कोणत्याही नियम अथवा आदेशाचा भंग केलेला नाही. तसेच काळेबाजारी अथवा साठेबाजी केलेली नसल्याने त्यांनी जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चा भंग केलेला नाही. मे. के.बी. प्रोडक्टस् या कंपनीच्या वतीने मा. प्राधिकरणास नम्रपणे विनंती करण्यात येते की, त्यांचा जप्त करण्यात आलेला खाद्यतेलाचा साठा हा नाशवंत असल्याने तो मुक्त करण्यात यावा व बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस मागे घेण्यात यावी. दिनांक २६/०३/२०१३ रोजी बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीसच्या विरोधात त्यांनी कोणतेही न्यायालय अथवा प्राधिकरणासमोर अपिल, रिव्हिजन, पिटीशन, अर्ज इत्यादी दाखल केलेले नाही. मा. सत्र न्यायालय, ठाणे यांनी नारपोली पोलिस ठाणे येथे दर शनिवार व सोमवार या दोन दिवशी पोलिस ठाणे येथे हजेरी लावण्याच्या अधिन राहून त्यांना अटकपूर्व जामिन मंजूर करण्यात आले आहे. मा.

प्राधिकरणास विनंती करण्यात येते की, कारणे दाखवा नोटीस मागे घेण्यात येऊन तसेच आपल्या अधिकाऱ्यांना निर्देशित करण्यात यावे की, जप्त करण्यात आलेला खाद्यतेलाचा साठा हा कंपनीच्या मालकीचा असल्याने तो मुक्त करण्यात यावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १३/०३/२०१३ रोजी या कार्यालयास मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि., दादोबा कंपाऊंड, अंजूर फाटा, अंजूर रोड, वळगांव, तालुका - भिवंडी, ठाणे - ४२१ ३२१ या ठिकाणी खाद्यतेलाची विनापरवाना खरेदी व विक्री केली जात असल्याबाबत मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयातीत फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह दादोबा कंपाऊंड, वळगांव येथे गाळा क्र. ९४५, ९४६ आणि १ ते ६ या ठिकाणी पोहचून तपासणी केली असता, मे. के.बी.प्रॉडक्टस् प्रा.लि. ९४६, ९४५ व त्यालगतच्या गाळा क्र. १ ते ६, दादोबा कंपाऊंड, अंजूर रोड, वळगांव, तालुका- भिवंडी, जि- ठाणे यांनी नमूद पत्त्यावर मोठया प्रमाणात साठवणूक केलेला खाद्यतेल या जीवनावश्यक वस्तूचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगुन स्वतःच्या स्वार्थासाठी, आर्थिक फायद्यासाठी सदर कंपनीच्या संचालकाने शासनाची तसेच उपभोक्त्याची फसवणूक केल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने, मे. के. बी. प्रॉडक्ट्स प्रा. लि. चे संचालक जगदीश सुखरामजी जैन व इतर संचालकांविरुध्द नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी येथे गुन्हा नोंद क्र. II २४/२०१३, दिनांक १५/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन खाद्यतेलाचा एकूण रुपये ३५,२७,७४३.४२/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अनुज्ञप्ती प्राधिकारी तथा उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्याकडून प्राप्त अहवालात, मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. यांची अनुज्ञप्ती क्र. ३७/फ/भिवंडी/सं.प./(६४) आहे. अनुज्ञप्तीचा व्यवसायाचा पत्ता :- ९४६, दादोबा कंपाऊंड, अंजूर फाटा, वळ व्हिलेज, तालुका - भिवंडी, जि. ठाणे असा आहे. अनुज्ञप्तीवर अनुसुचित वस्तु खाद्यतेलाची नोंद आहे. अनुज्ञप्ती दिनांक ३१.१२.२०१३ पर्यंत वैध आहे. सदर अनुज्ञप्तीच्या मुळ नस्तीचे अवलोकन केले असता, त्यामध्ये मे. के.बी. प्रॉडक्टस प्रा.लि. असल्याबाबतचे कंपनीचे मेमोरेडम जोडलेले आहे. कार्यालयीन अभिलेखावर नोंद घेते वेळी तत्काळातील कर्मचाऱ्यानी अभिलेखावर मे. के.बी. प्रॉडक्टस असे नमुद केलेले निदर्शनास येते. सदर अनुज्ञप्ती दिनांक १७/१२/२००९ रोजी वितरीत झालेली आहे. परवानाधारकाने दिनांक १८/०१/२०१२ रोजी गाळा क्र. १ ते ५, दादोबा कंपाऊंड, अंजूर फाटा, वळ व्हिलेज, तालुका - भिवंडी, जि. ठाणे अशी गोदामाची नोंद करण्यासाठी या कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे, असे नमुद केले आहे.

तसेच तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक (प्रशासन), नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांचे अभिवेदनात, मे. के.बी. प्रॉडक्ट्सचे मालक याने दिलेल्या जबाबात, त्यांचे कंपनीमध्ये खोबरेल तेल, सनफ्लावर तेल, राईचे तेल, तिळाचे तेलाचे, गायी म्हशीचे तुपाचे पॅकींग करुन सदरचे सर्व मालावर त्यांचे कंपनीचे नाकोडा या नावाचे लोगो (प्रिंटेड लेबल) लावुन सदरचे तेलाची महाराष्ट्र, अहमदाबाद (गुजरातराज्य), राजस्थान या राज्यांमध्ये होलसेल दराने विक्री करण्याचा व्यवसाय करीत असल्यांचे सांगितले आहे. त्यांचे कंपनीत तामीळनाडू येथुन खोबरेल तेल, लातुर येथुन सनफ्लावर तेल येते. राईचे तेल हे महारांष्ट्रामधुन येते. सदर तेल टँकर मधुन आमचे कंपनीचे ठिकाणी आल्यानंतर आम्ही टँकर मधील खाद्यतेल, तुप यांचे खाजगी लॅबरोटरी मध्ये गुणवत्ता परिक्षण करुन घेतो व नियमाप्रमाणे गुणवत्ता पुर्ण गुण असल्यास टँकरमधील तेल व तुप कंपनीमध्ये खाली करुन घेतो. जर टँकरमध्ये आलेले मालामध्ये योग्यती गुणवत्ता नसेल तर ते तेलाचा व तुपाचा टँकर जेथुन आला त्या कंपनीकडे परत पाठवित असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सदर कंपनीमध्ये फिर्यादी यांनी दिलेले फिर्यादीप्रमाणे जप्त दाखविलेला एकूण ६०१.१४ क्विंटल खाद्यतेलसाठा जप्त आहे. तसेच यातील आरोपीत श्री. जगदीश जैन यांनी त्यांचे दिलेल्या जबाबामध्ये सांगितलेले हकीकतीप्रमाणे त्यांचे कंपनीत पुर्वी झालेले कारवाईतील सध्या न्यायप्रविष्ठ असलेला खाद्यतेलसाठा फिर्यादी व त्यांचे पथकाने पुन्हा जप्त दाखविलेला आहे काय ? त्याबाबत फिर्यादी यांचेकडे सखोल तपास करणे आहे. तसेच शिधावाटप अधिकारी यांनी वरीलप्रमाणे जप्त केलेल्या अतिरिक्त खाद्यतेलसाठ्याबाबत आपले स्तरावर योग्य ते आदेश होणेस विनंती आहे, असे नमूंद आहे.

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम ११(१) अन्वये " No licensee or his agent or servant or any other person acting on his behalf shall contravene any of the terms and conditions of the license " असे नमूद आहे.

कलम ११(२) अन्वये " If the Licensing authority is satisfied that any such licensee or his agent or servant or any other person acting on his behalf contravene any of the said terms or conditions, it may, without prejudice to any other action that may be taken against him, by order in writing cancel or suspend his licence either in respect of all scheduled commodities covered by it or in respect of such of close commodities as it may think fit " असे नमूद आहे.

कलम १३ अन्वये " Maintenance of registers of transactions- Every licensee shall maintain a register of transactions as laid down in the terms and conditions of his licence and shown there in the names, addresses and such other particulars of transactions as the licensing authority may specify " असे नमूद आहे.

कलम १५(c)(i) अन्वये Seize " Any stock of scheduled commodities in respect of which he has reasons to believe that a contravention of any provisions of this order has been, is being, or is about to be commited " असे नमूद आहे.

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम ४(२) अन्वये देण्यात आलेल्या घाऊक परवानामधील अट क्र. ३(i) नुसार " The licensee shall, except when specifically exempted by the Government or by the licensing authority in this behalf maintain a register of daily accounts for each of the commodities mentioned in paragraph (i) showing correctly –

(m)the opening stock of each day.

(n) the quantities received on each day showing the place from where and the source from which received.

(o) the quantities, delivered or otherwise removed on each day, showing the places of destination; and

(p) the closing stock on each day.

अट क्र. ६ अन्वये " The licensee shall not-

(a)(i) enter into any transaction involving purchased, sale or storage for sales of commodities in a speculative manner prejudicial to the maintenance and easy availability of supplies of the commodities in the local market " असे नमूद आहे.

अट क्र. ७ अन्वये " The licensee shall exhibit at the business premises, the price list of the commodities held by him for sale. Such price list shall be legibly written in marathi or in the principal language of the locality concerned. It shall indicate separately the selling prices of different varieties of the commodities " असे नमूद आहे.

अट क्र. ८ अन्वये " The licensee shall, except when specifically exempted by the Government or by the licensing authority in this behalf, issue to every customer, a correct receipt or invoice or cash memo, as the case may be, for any sale exceeding Rs. 100 giving his own name, address, licence number, date of transaction, the quantity sold the price per kg/liter/package/tin and total amount charged and keep duplicate of the same to be made available for inspection on demand by the licensing authority of any other officer duly authorized in this behalf " असे नमूद आहे.

अट क्र. १० अन्वये " The licensee shall comply with any directions that may be given to him by the Government or by the licensing authority in regard to purchase, sale and storage for sale of the commodities and in regard to the language in which this register, returns, receipts or

invoice mentioned paragraphs (3), (4), (7) and (8) shall be written and the authentication of maintenance of the same " असे नमूद आहे.

अट क्र. १३ अन्वये " The licensee shall by liable for departmental action, prosecution or both as the case may be for the breach of any condition of this licence or any directions or orders issued by the Government or licensing authority from time to time. " असे नमूद आहे.

मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. या व्यवसायिक नांवे ९४६, दादोबा कंपाऊंड, अंजूर फाटा, वळ व्हिलेज, तालुका - भिवंडी, जि. ठाणे या नमूद पत्त्यावर महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सिंग ऑर्डर, १९९८ अन्वये खाद्यतेल या अनुसुचित वस्तूच्या घाऊक व्यापारासाठी परवाना प्राप्त करुन घेतल्याचे दिसून येते. मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. चे संचालक यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, तपासणी पथकाने कंपनीतील खाद्यतेलाच्या साठ्याची मोजदाद करताना यापूर्वी जप्त करण्यात आलेला ४३८.१७ क्विंटल खाद्यतेलाचा साठा त्यामध्ये समाविष्ठ करण्यात आल्याचे सांगून सदरचा अतिरिक्त जप्त असलेला साठा तपासणीच्या वेळी कंपनीत मोजदाद केलेल्या साठ्यामधून वजा करता उर्वरीत शिल्लक असलेला साठा हा कमाल विहित मर्यादेच्या आत असल्याचे सांगितले आहे. तथापी, तपासणी अहवालाचे अवलोकन करता, तपासणीमध्ये अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष कंपनीतील खाद्यतेल साठ्याची मोजदाद केली असता, प्रत्यक्षात पॅकिंग केलेला व टाक्यांमधील विविध प्रकारच्या खाद्यतेलाचा एकूण ६६०५९.४३ लिटर साठा आढळून आला. सदर साठ्याची प्रचलित पध्दतीनुसार साठापुस्तकात नोंद घेतली किंवा कसे ? याची पथकाने पडताळणी केली असता, दिनांक १४/०३/२०१३ रोजी सुरुवातीची शिल्लक या रकान्यामध्ये खोबरेल तेल १५७७ लिटर, सनफ्लॉवर तेल ६४५ लिटर, राईचे तेल १७४०२ लिटर, तिळ तेल ४९२४ लिटर असे मिळून एकूण २४५४८ लिटर खाद्यतेलाच्या साठ्याची नोंद आढळून आली. म्हणजेच कंपनीत साठवणूक केलेला साठा व प्रत्यक्षात साठा पुस्तकात नोंद केलेला साठा यामध्ये ४१५११.४३ लिटर म्हणजेच ३७७.७५ क्विंटल खाद्यतेलाच्या साठ्याची साठा पुस्तकात नोंद न घेता तो बेकायदेशिररित्या कंपनीत साठवणूक केल्याचे आढळून आले आहे. तपासणीच्या वेळी घटनास्थळी एकूण ६६०५९.४३ लिटर्स विविध खाद्यतेलाचा प्रत्यक्ष साठा म्हणजेच ६०१.१४ क्विंटल साठा आढळून आला. सदर साठवणूक केलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याची आकडेवारी पाहता मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. या कंपनीने ३०१.१४ क्विंटल खाद्यतेलाचा विहित कमाल मर्यादेपेक्षा अतिरिक्त साठा केल्याचे सिध्द होत आहे. यावरुन मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. चे संचालक यांनी सादर केलेले निवेदन मोघम स्वरुपाचे व या कार्यालयाची दिशाभूल करणारे आहे.

सदर कंपनीने घटनास्थळी असलेल्या गोदामात विविध प्रकारच्या खाद्यतेलाचा ६०१.१४ क्विंटल खाद्यतेलाचा साठा साठवणूक केल्याचे आढळून आले आहे. सदर तपासणीच्यावेळी घटनास्थळी पथकाने जप्त केलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याबाबत सुनावणीस उपस्थित असलेले कंपनीचे संचालक यांनी साठ्यासंबंधीचे खरेदी व

विक्री बिले सादर केलेली नाहीत. त्यामुळे तपासणीत अतिरिक्त आढळून आलेला खाद्यतेलाचा साठा तसेच साठा पुस्तकापेक्षा अतिरिक्त साठवणूक केलेला खाद्यतेलाचा साठा हा कोणाकडून खरेदी केला अथवा कोणास विक्री करीत असल्याबाबतचा कोणताही तपशिल सादर केलेला नाही. ही बाब गंभीर आहे. यावरुन परवानाधारक यांनी महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ या आदेशाचे तसेच त्याअन्वये देण्यात आलेल्या परवान्यामधील अटी व शर्तीचे भंग केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ या आदेशामधील तसेच त्याअन्वये त्यांना देण्यात आलेल्या घाऊक परवानाच्या तरतुदींनुसार परवानाधारक म्हणुन त्यांनी खरेदी बिले, विक्री पुस्तक इ. दस्ताऐवज अद्यावत ठेवणे गरजेचे असुन सदरचा संपुर्ण अभिलेख तपासणी पथकास अथवा सुनावणीस उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. तथापी, प्रत्यक्षात सुनावणीच्या वेळी सदरचा महत्वपूर्ण संपूर्ण अभिलेख साठा मालक यांनी सादर केला नाही. मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. या नांवे खाद्यतेलाचा घाऊक व्यवसाय करीत असताना साठा मालक म्हणुन ते करीत असलेल्या व्यवसायात व त्या अनुषंगाने आवश्यक अभिलेखात पारदर्शकता आणणे गरजेचे आहे. परंतु तपासणीचे वेळी पथकास या महत्वपूर्ण बार्बीचा अभाव असल्याचे सिध्द झाले आहे. प्रचलित नियमानुसार व्यवसाय करीत असतांना परवानाधारकास साठा खरेदी करतांना पुरवठादाराकडून खरेदी बिले प्राप्त करणे त्या अनुषंगाने साठा पुस्तकात नोंदी घेणे तसेच ते पॅकिंग करीत असलेल्या विविध प्रकारच्या खाद्यतेलाची प्रत्यक्षात उपभोक्त्यास विक्री करीत असतांना त्यांनी केलेल्या प्रत्येक विक्री व्यवहाराची बिले तयार करुन त्याचवेळेस उपभोक्त्यास देणे बंधनकारक आहे. सबब, साठा मालक यांनी सुनावणीस विक्री पुस्तक अथवा विक्री बिलांचा कोणताही तपशिल/अभिलेख सादर केला नसल्याने ते विना विक्री बिलांची अवैध विक्री करीत असल्याने त्यांचा संपूर्णतः अवैध व्यवसाय असल्याचे निष्पन्न होत आहे.

मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. चे संचालक जगदिश जैन यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद मुद्यांच्या अनुषंगाने लावण्यात आलेले आरोप त्यांना मान्य नसल्याचे सांगून जप्त साठा हा नाशवंत असल्याने ते परत करण्याची मागणी केली. तसेच विविध खाद्यतेलाचा साठा हा कंपनीत प्राप्त झाल्यानंतर सदर साठ्याचे नमुने घेण्यात येऊन ते प्रयोगशाळेत पृथःकरणासाठी पाठविण्यात येतात व सदरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर साठ्याची आवक कंपनीत घेण्यात येते, असे सांगितले.

महाराष्ट्र डाळी, खाद्यतेल बिया आणि खाद्यतेल (साठा निर्बंध), आदेश, (सुधारणा) आदेश, २०१० अन्वये महानगरपालिका क्षेत्र वगळून इतर ठिकाणी खाद्यतेलाच्या साठवणूकीकरीता घाऊक परवानाधारकास विहीत कमाल मर्यादा ३०० क्विंटल असुन तपासणीमध्ये आढळून आलेला एकूण ६०१.१४ क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा विहीत कमाल मर्यादेपेक्षा ३०१.१४ क्विंटल साठा अतिरीक्त असल्याचे आढळून येते. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता मे.

के. बी. प्रॉडक्टस प्रा.लि. चे संचालक यांनी साठवणूकीच्या विहित कमाल मर्यादेचे उल्लंघन करुन त्यांनी खाद्यतेलाची ३०१.१४ क्विंटल साठ्याची अतिरिक्त खरेदी व साठवणूक केल्याचे सिध्द होत आहे.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी तपासणी पथकाने धाडीच्या वेळी घटनास्थळी घर क्र. ९४५ मधील (राई तेल) तसेच गाळा क्र. १ ते ६ मधील (सनफ्लावर तेल) खाद्यतेलाच्या साठ्याचे घेतलेले नमूने पृथ:करणासाठी पब्लिक हेल्थ लॅबोरेटरी, कोकणभवन, नवी मुंबई यांचेकडे गोपनीय सांकेतिक कोड नमूद करुन पाठविण्यात येवुन जप्त खाद्यतेलाच्या साठ्यापैकी सनफ्लॉवर तेल व मस्टर्ड ऑईलचा (राई तेल) साठा हा मानवीय खाण्यास योग्य आहे किंवा कसे ? याची खातरजमा करण्यात आली असता, पब्लिक हेल्थ लॅबोरेटरी, कोकणभवन, नवी मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या पृथ:करण अहवालामध्ये, " the above samples nos. X-46, X-32, X-22 and X-57 confirm to the standards of Sunflower Oil as per Food Safety & Standards regulations-2011 and the above samples nos. X-48 and X-53 does not confirm to the standards of Mustard Oil as per Food Safety & Standards regulations-2011.", असे नमूद आहे.

उपरोक्त गुन्हा नोंद प्रकरणी मे. के. बी. प्रॉडक्टस प्रा.लि. यांच्या नमूद गोदामात तपासणीच्या वेळी पथकाने घटनास्थळी घर क्रमांक ९४५ मधील टाकी क्र. ५ व ६ मधुन राई तेलाचा नमूना तसेच गाळा क्र. १ ते ६ यामधील टाकी क्र. १०, ११, १२ व १३ यामधुन सनफ्लॉवर तेलाचा नमूना तसेच घर क्रमांक ९४५ मधील टाकी क्रमांक १, २, ३ व ४ व गाळा क्र. १ ते ६ मधील टाकी क्रमांक १४ व १५ यामधुन खोबरेल तेलाचा नमूना पंच व उपस्थित संचालक यांच्यासमक्ष प्रत्येकी ४ याप्रमांणे एकुण १२ नमूने घेण्यात आले. सदर घेण्यात आलेल्या १२ नमून्यांपैकी खोबरेल तेलाचे सहा नमूने वगळुन उर्वरीत दोन राई तेलाचे व चार सनफ्लॉवर तेलाचे असे एकुण सहा नमूने पृथ:करणासाठी पाठविण्यात आले.

सदर तपासणीच्यावेळी नमूद कंपनीत साठवणूक केलेल्या विविध खाद्यतेलाच्या एकुण ६०१.१४ क्विंटल साठ्यापैकी विहीत मर्यादेच्या आत असलेला ३०० क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा तपासणी पथकाने जागीच मुक्त करुन उर्वरीत अतिरिक्त आढळुन आलेला ३०१.१४ क्विंटल विविध खाद्यतेलाचा साठा हा जागीच जप्त केला आहे. पथकाने खाद्यतेलाचा ३०१.१४ क्विंटल साठा हा जप्त करताना गाळा क्रमांक १ ते ६ यामध्ये असलेल्या टाक्यांमधील सनफ्लॉवर तेल व खोबरेल तेल तसेच विविध क्षमतेच्या पॅकींगमधील सनफ्लॉवर व खोबरेल तेलाचा साठा, घर क्रमांक ९४५ यामध्ये टाकी क्रमांक ४ मधील खोबरेल तेल व विविध क्षमतेच्या पॅकीगमधील खोबरेल तेलाचा साठा तसेच घर क्रमांक ९४६ यामध्ये विविध क्षमतेच्या पॅकीगमधील तीळ तेलाचा साठा जप्त केला आहे. म्हणजेच घर क्रमांक ९४५ मधील राई तेलाच्या साठ्याचे पथकाने नमूने घेतले. परंतु सदरचा राई तेलाचा साठा जप्त मुद्देमालाच्या यादीत समाविष्ठ केला नाही. सद्यस्थितीत पृथ:करण अहवालानुसार राई तेलाचा साठा हा मानवीय खाण्यास

अयोग्य असल्याबाबतचा पृथ:करण अहवाल प्राप्त झाला आहे. तथापी, सदरचा राई तेलाचा साठा हा जप्त नसल्याने त्या साठ्याबाबत सद्यस्थितीत जप्तीची कारवाई करणे शक्य नाही.

उपरोक्त नमूद पब्लिक हेल्थ लॅबोरेटरी, कोकणभवन, नवी मुंबई यांनी सादर केलेल्या पृथ:करण अहवालाचे अवलोकन करता एकूण ६ नमून्यांपैकी ३ नमूने हे " does not conform to the standards of Mustard Oil as per Food Safety & Standards regulations-2011.", असे नमूद आहे. यावरुन मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. चे संचालक हे त्यांच्या कंपनीत कमी प्रतीचे खाद्यतेल हे विविध क्षमतेच्या डब्यांमध्ये पॅकिंग करुन त्या डब्यांवर राई तेलाची लेबले लावून त्यामधील खाद्यतेलाचा साठा हा उच्च प्रतीचा असल्याचे भासवून भेसळयुक्त खाद्यतेलाच्या साठ्याची विक्री करुन ग्राहकांची फसवणूक करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. तसेच मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. चे संचालक हे वरील नमूद धोकादायक पध्दतीचा अवलंब करुन भेसळयुक्त साठ्याचा व्यवसाय कार्यरत ठेऊन जनसामान्यांच्या जिवीतास धोका निर्माण करीत असल्याची बाब प्रकर्षाने नमूद करावीशी वाटते. मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. चे संचालक यांनी भेसळयुक्त साठ्याचा व्यवसाय करुन गोरगरीब जनतेच्या तथा उपभोक्त्यांच्या जीवीतास धोका निर्माण केल्याने ते गंभीर सामाजिक अपराधाच्या शिक्षेसही पात्र आहेत. मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. चे संचालक यांनी विहीत मर्यादेपेक्षा ३०१.१४ क्विंटल अतिरिक्त खाद्यतेलाच्या साठ्याची साठवणूक करुन तसेच भेसळयुक्त खाद्यतेलाच्या साठ्याची विक्री करुन केलेल्या गैरकृत्यामुळे परवानाधारक म्हणुन शासनाची विश्वासार्हता गमावली आहेच याशिवाय त्यांनी सदरचा अवैध व्यवसाय कार्यरत ठेवून इतर संबंधित शासकिय विभागांचीही दिशाभुल केली असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. चे संचालक हे भेसळयुक्त खाद्यतेलाच्या साठ्याचा अवैध व्यवसाय करीत असल्याचे सिद्ध झाल्याने, त्यांचे विरुद्ध फुड सेफ्टी ॲण्ड स्टॅंडर्डस ॲक्ट, २००६ अंतर्गत कारवाई करण्याकरीता आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, बांद्रा, मुंबई यांचेकडे अलाहिदा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सबब, मे. के. बी. प्रॉडॅक्टस प्रा.लि. यांचा घटनास्थळी जप्त करण्यात आलेला विविध प्रकारचा सुटा तसेच पॅकबंद डब्यांमधील अतिरिक्त आढळुन आलेला खाद्यतेलाचा ३०१.१४ क्विंटल साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी येथे गुन्हा नोंद क्र. II २४/२०१३, दिनांक १५/०३/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) प्रस्तुत गुन्हा नोंद प्रकरणी घटनास्थळी जप्त करण्यात आलेला विविध प्रकारच्या खाद्यतेलाचा सुटा तसेच पॅकबंद डब्यांमधील ३०१.१४ क्विंटल साठा हा शासनजमा करण्यात यावा.

२) उक्त शासनजमा करण्यात आलेला खाद्यतेलाचा संपूर्ण साठा हा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे (दुरध्वनी क्र. ०२२-२५३३२६५७) यांचे मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/—
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

**प्रति,**

१) जगदीश सुखरामजी जैन, मे. के. बी. प्रॉडक्टस प्रा.लि. कंपनीचे संचालक व इतर संचालक
२) मे. के. बी. प्रॉडक्टस प्रा.लि. कंपनीचे इतर संचालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांचे मार्फत)

**प्रत,**

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, कक्ष क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.